टा

क्र.कावि/कक्ष7:2/प्रअभूसं/न.क्र.102/कावि-/4079/19
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- ३० / ११ / 2019

विषय :- जिगांव प्रकल्प ता.नांदुरा
भूसंपादन प्रकरण क्रमांक ०९/२०१२-१३ मौज सुलतानपुर ता.जळगाव जामोद मध्ये प्रारुप निवाडया करीता मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ:- उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी जळगांव जामोद यांचे पत्र क्र.उविअजजा/भूसंपादन लि./कावि/३६०/२०१९ दिनांक १५-११-२०१९.(प्राप्त दि. २५-११-२०१९.)

*****

ज्या अर्थी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी जळगांव जामोद यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार जिगांव प्रकल्प ता.नांदुरा भूसंपादन प्रकरण क्रमांक ०९/२०१२-१३ मौज सुलतानपुर ता.जळगाव जामोद मध्ये प्रारुप निवाडया करीता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रकरणामध्ये फळझाडांचे मुल्यांकन बाबतचा अहवाल नमुना ड प्राप्त झाला आहे. त्याची छाननी करण्याची कार्यवाही सूरु आहे. सदर कार्यवाही नंतर प्रकरणात प्रारुप निवाडा तयार करुन मंजुरीस पाठविणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणात आवश्यक असलेला निधी संबंधित यंत्रणेने अद्यापपावेतो या कार्यालयात भरणा केलेला नाही याबाबत यंत्रणेला वेळोवेळी पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता.जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग.शेगांव यांनी त्यांचे पत्र दिनांक १३-११-२०१९ पत्रान्वये निधीची मागणी वरीष्ठ कार्यालयास करण्यात आली असून निधी प्राप्त होताच त्याचा भरणा आपल्या कार्यालयास करण्यात येईल. सदर प्रकरणात अधिसुचना १९ ही दिनांक २६-११-२०१८ मंजुर होऊन ती दिनांक १३-१२-२०१८ रोजी जाहिर प्रसिध्द झालेली आहे. त्यानुसार सदर प्रकरण हे दिनांक १२-१२-२०१९ रोजी निधी अभावी व्यपगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे नमुद केले आहे. घेण्याबाबत विनंती केलेली आहे.

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी जळगांव जामोद यांनी उक्त प्रकरणात प्रारुप निवाडा करण्याकरीता एक वर्षाची मुदवाढ मिळण्याबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 25 मध्ये जिल्हाधिकारी,कलम 19 अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु,त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की. कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय,लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल.अशी तरतूद आहे.

तरी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम २५ नुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक ०९/२०१२-१३ मौज सुलतानपुर ता.जळगाव जामोद जि.बुलडाणा या प्रकरणात प्रारुपनिवाडा करण्यास एका वर्षाची मुदतवाढ देण्यांत येत आहे.

Dange

(डॉ.निरुपमा डांगे)
जिल्हाधिकारी बुलडाणा